जा.क्र./OW.No. 1360/पोउआ/प्रकटीकरण /2022
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220
दिनांक/Date : 29/11/2022

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month OCTEMBER– 2022 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month OCTEMBER – 2022 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन/बेस्ट रिकव्हरी ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे सप्टेंबर–२०२२ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे ऑक्टोंबर – २०२२ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

गु.प्र.शा.गु.अ.वि, कक्ष–११, गुन्हे शाखा, मुंबई, कांदिवली पोलीस ठाणे गु.र.क्र. १२५६/२०२२ कलम ३०२, ३०७, ५०४, ३४ भादवि सह कलम ३,२५ भाहका

**ब) माहे ऑक्टोंबर – २०२२ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

**विनोबा भावे पोलीस ठाणे**, परिमंडळ–०५ मुंबई गु.र.क्र. १२५/२०१९ कलम ३५४, ३७६(अ) (ब) (क), ५०६ भादवि. सह ४, ८, १०, १२ पोक्सो ॲक्ट

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

मजकुर :—

दिनांक २५/११/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे ऑक्टोंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०२ | कक्ष ११ , गुप्रशा., गुअवि. मुंबई | कांदिवली पोलीस ठाणे गु.र.क्र. १२५६/२०२२ कलम ३०२,३०७,५०४,३४ भादवि सह कलम ३,२५ भाहका |

—: " जुन्या राग मनात धरून जिवे ठार मारणे ":—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दिंनाक ०१/१०/२०२२ रोजी ०६.५३ वा. सुमारास कांदिवली पोलीस ठाणे हद्दित न्यू लींक रोड, कल्पवृक्ष हाईटस बिल्डींग येथे इसम सोनु पासवान व त्याचा मित्र सुरज गुप्ता यांनी जुन्या भांडणाचे कारणावरुन फिर्यादी श्री. दिनकर चमन पाल, वय—३० वर्षे यास शिवीगाळ केली. सदर वेळी फिर्यादी व त्यांचे मित्रांनी त्यांना पकडले असता सोनु पासवान याने त्यांचेकडे असलेल्या गावठी पिस्टल मधून अंदाधुंद फायरींग करुन फिर्यादी यांचा मित्र अंकीत यादव, यास जिवे ठार मारले. सदरवेळी रोडवरील दोन पादचारी श्री. अविनाश दाभोळकर व अन्य यांचेवर सुध्दा फायरींग करुन त्यांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला व ॲक्टीव्हा गाडीवरुन बोरीवलीच्या दिशेने पळुन गेले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. दिनकर चमन पाल, वय—३० वर्षे |
| बळीत | :— | श्री. अंकीत यादव, वय—२४ वर्षे |
| गुन्हयातील हस्तगत मालमत्ता | :— | १) १०,०००/— रु किंमतीचे दोन मोबाईल फोन<br>२) २५,०००/— रु कि. गुन्हयात वापरलेले एक गावठी पिस्टल<br>३) ८०,०००/— रु किमतीची गुन्हयात वापरलेली ॲक्टीवा गाडी |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) सोनु चंद्रभान पासवान, वय—२७ वर्षे<br>२) सुरज रामकिसन गुप्ता, वय—२० वर्षे<br>आरोपी अटक दिनांक ०२/१०/२०२२ रोजी |

तपास कौशल्य :— सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने माहिती मिळाल्यावर लागलीच ०३ टिम तयार करुन सदर गुन्हयाच्या घटनास्थळाला भेट देण्यात आली. त्यानंतर सीसीटिव्ही फुटेज चेक करणे, पाहीजे आरोपीतांचा तांत्रीक तपास करणे तर पाहीजे आरोपी हे कोठे जावु शकतात त्याबाबत माहिती घेण्यात आली. सदरचे दोन्ही आरोपी यांनी घटनास्थळावर पळुन गेल्यावर त्यांचे मोबाईल फोन बंद केलेले असल्याने त्यांचा शोध घेण्यात अडचणी निर्माण होत होत्या. एका आरोपीताचा फोन चालु करुन लागलीच बंद केल्याने त्याचे लोकेशन घेतल्यास ते हे मिरा रोड येथील असल्याने सदर परीसरातील हॉटेल लॉजेस चेक करुन आरोपीतांचा शोध घेतला परंतु उपयुक्त माहिती मिळुन आली नाही.

त्यानंतर सकाळी आरोपीतांन परत फोन चालु करुन बंद केला त्यावेळी त्याचे लोकेशन हे गुजरातच्या दिशेने जात असल्याचे समजल्याने लागलीच वरीष्ठांची परवानगीने तपासी पथक रेल्वेने तसेच खाजगी वाहनाने सुरत, राज्य गुजरातच्या दिशेने रवाना झाले. सदर वेळी त्यांचे मोबाईलच्या सी डी आर प्राप्त करुन त्यांचे तांत्रीक विश्लेषन केले असता सदरचे आरोपी हे बिलिमोरा, नवसारी, राज्य गुजरात येथे असु शकतात अशी माहिती मिळाली. सदर बाबत तांत्रीक तसेच गोपनीय माहिती प्राप्त करुन बिलमोरा रेल्वे स्टेशन येथे आरोपीतांचा कसोशीने शोध घेण्यात आला असता पाहीजे आरोपीतांना सदर रेल्वे स्टेशनवरुन ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली. त्यांचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. गुन्हयाचे अनुषंगाने विचारपुस केली असता आरोपी सोनु पासवान याने गुन्हयात फायरींग करण्यासाठी वापरलेले हत्यार तसेच ॲक्टीवा गाडी काढुन दिल्याने त्याबाबत सविस्तर निवदेन पंचनामा नोद करण्यात आला.

अशाप्रकारे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सांघिक भावनेने, तपासाच्या दिशेची गुप्तता राखुन तपासाचा कसलाही मागमुस आरोपीस लागु न देता आपल्या मानवी तसेच तांत्रिक कौशल्याचा पुरेपुर उपयोग करून अधांधुद फायरींग करुन एका व्यक्तीला जिवे ठार मारणाऱ्या व इतर ०३ लोकांना जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन्ही मुख्य आरोपीतांना २४ तासाच्या आत बिलमोरा, नवसारी राज्य गुजरात येथुन ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणला. या कामगिरीमुळे जनमानसात मुंबई पोलीसांची प्रतिमा उंचावलेली आहे.

गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—११, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | विनायक चव्हाण | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | मानसिंग पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | भरत घोणे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | सहा. पोलीस निरीक्षक | विशाल पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | स.पो.उ.नि. ९७१४ | दिपक कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र.३२७४० | चंद्रसेन गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.२९२१० | सुधीर तरटे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.३४३८३ | गिरीष सुर्वे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.००४८५ | जयेश केणी | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र.०३३६० | सचिन खताते | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र.०३३५२ | अजय कदम | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.शि.क्र.१५१५५३ | सुशांत पाटील | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २५/११/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे ऑक्टोंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ऑक्टोंबर — २०२२

| | | |
|---|---|---|
| ०२ | विनोबा भावे पोलीस ठाणे, परिमंडळ— ०५, मुंबई. | **गु.र.क्र. १२५/२०१९ कलम ३५४, ३७६(अ) (ब)(क), ५०६ भादवि. सह ४, ८, १०, १२ पोक्सो ॲक्ट** |

### —: '' अल्पवयीन मुलीवर लैगीक अत्याचार '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्रीमती लैला जावेद शेख, वय ३४ वर्षे यांची बळीत अल्पवयीन मुलगी कु. अबिदा, वय ०८ वर्षे ही दिनांक ०६/०५/२०१९ रोजी शिक्षक सलमान अहमद नफीस अन्सारी, वय ३५ वर्षे यांचेकडे शिकवणी करीता गेली होती. तेव्हा नमुद शिक्षकाने बळीत कु. अबिदा, हिच्या छातीस, गुप्त भागास आणि दोन पायामध्ये हात फिरवुन तिच्या लघवीच्या जागेत जोरात हाताचे मधले बोट घालुन लैगिंक अत्याचार केला. तसेच सदरबाबत कोठे वाच्यता केल्यास तिला धमकी दिली म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती लैला जावेद शेख, वय ३४ वर्षे |
| बळीत | :— | कु. अबिदा जावेद शेख वय ०८ वर्षे, |
| निकाल दिनांक | :— | दि. २०/१०/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | सलमान अहमद नफीस अन्सारी, वय ३५ वर्षे,<br>अटक दिनांक ०६/०५/२०१९ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | मा.न्यायालयाने आरोपीतास कलम ३७६ (अ)(ब) भा.द.वि.तसेच ४, ८, १०, १२ पोक्सो ॲक्ट अन्वये **' २० वर्ष सक्त मजुरी व रु. ५,०००/— दंड तसेच दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद.** अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयाचा तपासामध्ये बळीत मुलीचा सीआरपीसी कलम १६४ अन्वये जबाब नोंदविण्यात आले. घटनास्थळांचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. बळीत मुलीची वैदयकीय तपासणी करण्यात आली आहे. मा.संचालक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना, सांताक्रुझ, मुंबई येथील अहवाल.प्राप्त केला. गुन्हयाच्या तपासामध्ये एकूण १० साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले त्यानंतर विहीत वेळेत मा. सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

नमुद दोषारोपपत्र दाखल केल्यावर सत्र न्यायालय खटला क्रमांक ३९९/१९ मध्ये आरोपीने मा. सत्र न्यायालयात ०३ वेळा जामीन मिळणेकरिता अर्ज सादर केला असता भक्कमपणे अहवाल सादर करण्यात आल्याने त्याचा जामीन अर्ज ०३ वेळा मा.न्यायालयाने नामंजूर केला. मा. सत्र न्यायालयात खटला चालु असताना न्यायालयीन कामकाज करणाऱ्या पथकाने सदर खटल्यातील पंच/प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांना वि.भा.नगर पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून पुन्हा घटनेचे वाचन करून योग्य मार्गदर्शन केले.

खटल्यातील पंच/साक्षीदारांना वेळोवेळी प्रत्येक तारखेस मा. सत्र न्यायालयात हजर ठेवून वेळोवेळी घटनेची आठवण करून देण्यात आली व त्यानूसार मा.न्यायालयात भक्कमपणे साक्षीदारांनी साक्ष दिली. नमुद खटल्यामध्ये मा. सत्र न्यायालयाने ०२ पंच आणि ०८ साक्षीदार असे एकुण १० साक्षीदार तपासण्यात आले. मा. सत्र न्यायालयाच्या कामकाजाच्या वेळी सक्रियपणे सहभाग घेवून आरोपीतांना त्यांनी केलेल्या गुहयांमध्ये २० वर्षे सश्रम कारावास व ५,०००/— हजार दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावण्यात आली

विनोबा भावे पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | सहा. पोलीस निरीक्षक | सचिन गावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस उप निरीक्षक | सुभाष राठोड | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस उप निरीक्षक | विजय वारीक | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ना.क्र. ०३०९९६ | सहदेव सरवणकर | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.शि.क्र. ०९०५४६ | विजय पवार | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | म.पो.शि.१४०८४१ | मंगल गोमासे | प्रशस्तीपत्रक |

टिप:— वरिष्ठ /प्रभारी पोलीस निरीक्षक, गु.प्र.शा.,गु.अ.वि., कक्ष—११, गुन्हे शाखा, मुंबई तसेच विनोबा भावे पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, Best Detection of the Month Octember – 2022 व Best Conviction of the Octember – 2022 या करीता निवड झालेनंतर राज्य स्तरावर गुणात्मक अन्वेषणासाठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न (Best Detection of Month) व (Best Conviction of the Month ) या करीता प्रत्येक महिन्याला सर्वोत्कृष्ट गुन्हयांचा शिफारस अहवाल मा. अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे यांना पाठविला जातो. त्याकरीता खालील नमुद प्रपत्र 'क' प्रमाणे माहिती भरून सोबत तपासी पथकातील फक्त ०४ जणांच्या नावाची शिफारस करावी. शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र जोडावे. तसेच गुन्हयाशी संबधीत कागपत्र जोडणे आवश्यक आहे.

## Best Detection of the Month
## 'प्रपत्र ' क '

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | फिर्यादीचे नाव, पत्ता | |
| ०३ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०४ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०५ | गुन्हा उघड दिनांक | |
| ०६ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०७ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०८ | **Property offence** बाबतीत<br>**a)** गेलेला माल<br>**b)** जप्त/हस्तगत केलेला मालं | |
| ०९ | मयत/पिडीत व्यक्तीची माहिती | |
| १० | आरोपी मृतक/पिडीत नाते | |
| ११ | गुन्हयात तपासलेले प्रत्यक्ष साक्षीदार व त्यांचे पुरावा योग्य जबाब थोडक्यात | |
| १२ | घटनास्थळ पंचनामा वरून प्राप्त पुरावे<br>**a)** घटनास्थळ फोटो / छायाचित्रण केले आहे का? | |
| १३ | **Inquest** पंचनामा माहिती | |
| १४ | शवविच्छेदन अहवाल माहिती | |
| १५ | गुन्हयात वापरेले शस्त्र/जखमा याबाबत वैदयकीय अभिप्राय | |

| | | |
|---|---|---|
| १६ | **DNA** टेस्ट केली असल्यास न्यायवैद्यक प्रयोग शाळेचे अहवाल | |
| १७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| १९ | पाहिजे /फरारी आरोपी नाव, वय, पत्ता | |
| २० | **CDR/SDR/C.C.T.V/Electronic Evidence** बाबत माहिती भा.पु.का.क. ६५(ब) प्रमाणे प्रमाणपत्र हस्तगत केले आहे का ? | |
| २१ | **Cyber Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २२ | **FORENSIC Expert** ची मदत घेतली का कशासाठी ? | |
| २३ | **Dog Squad** ची मदत घेतली का ? कशप्रमाणे | |
| २४ | **Fingerprint / Handwriting Expert** ची मदत घेतली का | |
| २५ | आरोपी **Portrait** बाबत **Expert** ची मदत घेतली का ? | |
| २६ | आरोपीचे गुन्हेगारी रेकॉर्ड तपासून निष्पन्न झालेली माहिती | |
| २७ | गुन्हयात कोणती टोळी (गॅग) निष्पन्न झाली आहे का ? असल्यास माहिती | |
| २८ | आरोपीची ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी समोर घेतली आहे का ? | |
| २९ | जप्त मालाची आळख कार्यकारी दंडाधिकारी समोर करून घेतली का ? | |
| ३० | गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व आरोपी अटकेसाठी केलेल प्रयत्न थोडक्यात | |
| ३१ | आरोपी अटकेसाठी कलेले प्रयत्न थोडक्यात | |
| ३२ | गेपनिय माहिती कशा प्रकारे प्राप्त केली | |
| ३३ | गुप्तवार्ता संकलनामध्ये खाजगी व्यक्तीची मदत झोतली का? | |
| ३४ | गुप्त बातमीदार पोलीसांनी स्वत: नेमले होते का ? | |
| ३५ | गुन्हा उघडकीस आणण्याकरीता योगदान देणारे अधिकारी/पोलीस अंमलदार | |

१) **FIR** प्रत सर्व पंचनाम्याच्या प्रती, महत्वाचे साक्षिदरांचे जबाब,शवविच्छेदन अहवाल, आळखपरेड कागदपत्रे, वैदकीय अधिकारी यांचे शस्त्र व जखमांबाबत अभिप्राय, आरोपी पुर्वीचे गुन्हेगारी **Record,** दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेली प्रत, Inquest पंचनामा, घटनास्थळ पंचनामा, भा.पु.का., कलम २७ प्रमाणे जप्ती पंचनामा, इत्यादी कागपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) गुन्हयाचे दोषारोपपत्र ज्या महिन्यात दाखल करण्यात आले आहे त्याच महिन्याचे गुणात्मक अन्वेषणा साठी सर्वोत्कृष्ट प्रयत्न बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.सदर प्रस्ताव दोषारोपपत्र दाखल केलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

# Best Conviction of the Month

## ‘प्रपत्र ‘ क ’

| अ.क्र | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | घटक, पोलीस ठाणे | |
| ०२ | गुन्हा घडला दिनांक, वेळ, ठिकाण | |
| ०३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | |
| ०४ | गुन्हयाची थोडक्यात हकिकत | |
| ०५ | दोषारोपपत्र दाखल दिनांक, न्यायालय, कोर्ट केस क्रमांक | |
| ०६ | गुन्हयाचा निकाल दिनांक | |
| ०७ | निष्पन्न आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०८ | अटक आरोपी नाव, वय, पत्ता | |
| ०९ | फरार आरोपी अटक, सी.आर.पी.सी., कलम ८२,८३ नुसार कार्यवाही केली आहे का ? | |
| १० | प्रत्येक आरोपीला झालेली शिक्षा | |
| ११ | न्यायालयाने ज्या पुरावा साखळीचे आधारे शिखा दिली त्याबाबतची सविस्तर माहिती.<br>**A**) साक्षीदारांचे न्यायालयासमोर जबाब<br>**B**)पंचांचें न्यायालयासमोर जबाब<br>**C**) परिस्थितीजन्य पुरावा साखळी<br>**D**) तज्ञ व्यक्तीचे जबाब<br>**E**) वैज्ञानिक /तांत्रिक पुरावे<br>**F**) तपासी अंमलदार यांचे जबाब<br>**G**) पैरवी अधिकारी नाव व कामगिरी<br>**H**) सरकारी वकील नाव व कामगिरी | |
| १२ | तपास व अपराधसिध्दी करीता यांगदान देणारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार यांची नावे | |

१) मा.न्यायालयाचे निकालपत्र प्रस्तावासोबत जोडण्यात यावे.

२) गुन्हयाचे निकाल ज्या महिन्यामध्ये देण्यात आललो आहे त्याच महिन्याचे सर्वोत्कृष्ट अपराधसिध्दी बक्षिसाकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा. सदर प्रस्ताव निकाल लागलेल्या दिनांका पासून पुढील महिन्याच्या ३० तारखेपर्यंतच पाठविण्यात यावेत. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा बक्षिसाकरीता विचार करण्यात येणार नाही.

३) शिफारसपात्र अधिकारी व कर्मचारी यांचेवर मागील ५ वर्षामध्ये कोणताही गुन्हा अगर चौकशी प्रलंबीत नसलेबाबत घटकप्रमुखांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे

# INTEGRITY CERTIFICATE

Certified that the integrity of Mr/Mrs …………………………………, Designation-…………………., Recommended for the award of **" Excellence in Investigation"** for the Month of ……..Year 2022 is above suspicion and that he / she was not concerned in any proceeding that was censured in a court of law. It is further certified that no judicial or departmental proceeding are being contemplated/pending against him / her similarly no vigilance case is being contemplated/pending against him/her. It is also certified that recommendee has not been given any Major Penalty/Minor penalty in the last Five year.

2. It is also certified that the character and antecedents (of the proposed awardee) have been duly verified and nothing adverse reported against him/her.

**Name:-**
Desiganation:- Addl. Commissioner of Police
…………. Mumbai
Contact No :- 022-
Date :- / /2022